**Research Papers**

# महाराष्ट्रातील सहकारी बँका व त्यांची कार्यपध्दी एक आढावा.

**प्रा. वसंत व्हि. आरू**

**सहा. प्राध्यापक , वाणिज्य विभाग ,**
**श्री रामराव झनक कला व वाणिज्य महाविद्यालय मालेगांव ता.मालेगांव जि. वाशिम.**

***प्रस्तावना***

भारत हा कृषी प्रधान देश आहे. भारतातील जनता ही ७०% ग्रामीण भागात राहणारी आहे. ७५% लोक हे शेती क्षेत्राशी निगडीत आहेत. भारतातील शेती हि निसर्गावर अवलंबून आहे. नैसर्गीक आपत्ती, कोरडा दृष्काळ, ओला दुष्काळ इत्यादी कारणामुळे भारतातील शेतकरी कधीही समृध्द बनला नाही. नेहमी तो गरीबीतच राहत आला.

स्वातंत्र्य पूर्व काळात इंग्रज कायदयामुळे जमीनार व सावकार यांनी शेतकरी व शेतमजूर यांची खुपच पिळवणूक केली.

२० व्या शतकात युरोप खंडात सहकारी संघटनाची लक्षणीय प्रगती केली. भारतात देखील सहकारची पहाट फुटण्याची लक्षणे दिसु लागली.

१९०४ मध्ये पहिला "सहकार विषयक कायदा " मंजूर झाला व पहिली सहकारी बॅंक आस्तित्वात आली. १९१२ मध्ये या कायदयात सुधारणा करण्यात आली व कायदा अधिकत व्यापक बनविण्यात आला. श्री मॅकलॅगन याच्या अध्यक्षतेखाली शासनाने समिती नेमली. त्यानंतर १९२९ मध्ये सहकार हे एका स्वतंत्र मंत्रयाकडे असावे असे नमुद केले. गाडगीळ समितीने भारतातील ग्रामीण भागातील पतपुरवठयाच्या प्रश्न सोडविण्यासाठी सहकारी बॅंक . हि एक उत्तम व्यवस्था आहे असे मत व्यक्त केले

**सहकारी बॅंकेची रचना :-**

सध्या अस्तित्वात असलेल्या भारतातील सहकारी बॅंकाची सरंचना ही मुख्यतः तीन स्तरावर **केली गेली.**

१) राज्य सहकारी बॅंक

२) जिल्हा सहकारी बॅंक किंवा मध्यवर्ती सहकारी बॅंक .

३) नागरी सहकारी बॅंक, प्राथमिक शेतकरी सहकारी पतसंस्था, बिगर शेतकरी सहकारी संस्था.

**पत पुरवठा :-**

सहकारी बॅंकांना राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीन बॅंकेकडून निधी मिळतो व हया निधीतूनच सहकारी बॅंक आपल्या सभासदांना दिर्घ व अल्प मुदतीची कर्ज देत असते.

**सहकारी बॅंकाचे महत्व आणि फायदे :-**

**१) सभासदांना दिर्घ मुदतीचे कर्ज. :-**

सहकारी बॅंक आपल्या सभासदांना शेतीतील तसेच व्यवसायासाठी दिर्घ मुदतीचे कर्ज देते. दिर्घ मुदतीच्या कर्जाची परतफेड ही ५ ते २० वर्षापर्यंत असते. दिर्घ मुदतीचे कर्ज प्राप्त झाल्यामुळे शेती. तसेच शेती व्यवसायात मोठया प्रमाणावर भांडवल गुंतवणूक करून शेतीतील उत्पादन वाढविण्यात येते. व्यवसाय मोठया प्रमाणत भांडवल गुंतविण्यामुळे वस्तुची मोठया प्रमाणात खरेदी करून त्यांची पुर्णविक्री करून नफा होतो. परिणामी राजेजगार प्राप्त होते.

**२) सभासदांना अल्प मुदतीचे कर्ज :-**

भारतातील शेतकरी मुख्यत: दोन पिके होतो. एक खरीप व रबी शेती ही निसर्गावर अवलंबून असल्यामुळे शतीमध्ये नफा होईल यांची खात्री नसते. तसेच मालाला योग्य भाव मिळेल याची सुध्दा खात्री नसते. सहकारी बॅंक हया मधून आपल्या सभासदाची सुटाक करते. योग्य वेळी शेती साठी अल्प मुदतीची कर्ज देत असते. सहकारी बॅंकाच्या माध्यमातून ग्रामीन भागात सामाजिक व आर्थिक जीवनमान उंचावण्यास मदत मिळते.

**३) एक व्यक्ती एक मत :-**

सहकारी बॅंक प्रशासन हे लोकशाही पध्दतीने चालते प्रत्येक सभासदाला एकच मत देण्याचा अधिकार असतो. त्यामुळे सहकारी बॅंकेवर विशिष्ट व्यक्ती किंवा विशीष्ट वर्गाची मक्तेदारी स्थापन होत नाही. सर्व सभासदांना समान संधी प्राप्त होते.

**४) शेत मालाची विक्री :-**

सभासदांना शेत मालाची सहकार पध्दतीने विक्री करण्यासाठी उत्तेजन आणि प्रेरणा मिळते. सहकारी तत्वानुसार खरेदी विक्री संख्या शेतकऱ्याचा माल घेण्यासाठी बाजार समिती निर्माण करतो .

**५) मालाची साठवणूक :-**

सहकारी बॅंक व इतर सहकारी संस्था गोडावून ची व्यवस्था करतात शेत मालाला जेव्हा रास्त भाव मिळत नाही तेव्हा शेतकऱ्याच्या माल तारण ठेवून त्यंना योग्य वेळी कर्ज दिले जाते परिणामी सावकारी फासातून त्यांची सुटका होते.

६) **तारण कर्ज :-**

आकास्मिक स्वरूपात पैशाची गरज निर्माण झाल्यास सहकारी बॅंक आपल्या सभासदांना सोने तारण ठेवून देखील वित्त पुरवठा करते.

१) **लाभांश :-** सहकारी बॅंकेला मोठया प्रमाणात लाभ झाल्यास ती आपल्या सभासदांना खरेदी केलेल्या भागावर लाभांश सुध्दा देते.

**राज्य सहकारी बॅंकाची उद्दीष्टे :-**

१) राज्य सहकारी बॅंक ही सर्व मध्यवर्ती बॅंकाच्या व्यवहारात योग्य समन्वय आणि संतुलन साधते.
२) जिल्हा मध्यवर्ती बॅंका आणि नाणे बाजार यांच्या समन्वय साधते.
३) राज्यातील सर्व सहकारी बॅंकापर्यंत (NABARD) कडून मिळालेला पैसांचा पुरवठा करणे.
४) राज्यातील सहकारी चळीचे नेतृत्व करणे व सहकारी चळवळीच्या वाढीव मदत करणे.

**राज्य सहकारी बॅंकेच्या समस्या :-**

**१) अपूरी ठेव** :-

ना नफा ना तोटा हे सहकारी बॅंकेचे ब्रिद वाक्य असल्यामुळे तसेच संचालक मंडळाची केलेल्या घोटाळा मुळे राज्य सहकारी बॅंकेत ठेवी ठेवण्यास सहजासहजी तयार होत नाही.

**२) सदोष कर्ज पध्दती :-**

अनेक अनुभव व घटना वरून असे दिसून येते की, अनेक सहकारी बॅंका हया जवळच्या लाकांना कोणतेही तारण न घेता किंवा अल्प तारणावर मोठया प्रमाणात कर्ज देतात.

**३) वाढती थकबाकी :-**

बॅंकेनी दिलेली कर्ज वेळत भरून घेत नसल्यामुळे दिलेल्या कर्जाची थकबाकी ही वाढत जात आहे.

**४) सदोष नियंत्रण :-**

सहकारी बॅंकावर राज्य सरकार व नाबार्ड चे नियंत्रण असते परंतु राजकीय हस्तक्षेप होत असल्यामुळे नियंतत्रणात अनेक दोष आढळून येतात.

**५) नियोजनाचा अभाव :-**

राजकीय हस्तक्षेप व संचालक मंडळाचे हित संबंध हया कारणामुळे बँकेचे योग्य पध्दतीने नियोजन केल्या जात नाही.

**६) मध्यकालीन कर्ज पुरवठयाकडे दुर्लक्ष :-**

सहकारी बँक ही अल्प व दिर्घ मुदतीचे कर्ज देते परंतु मध्यकालीन कर्ज पुरवठयाकडे दुलर्क्ष करते.

**जिल्हयामध्यवर्ती बँक :-**

**उद्दिष्टे :-**

१) आपल्या कार्यक्षेत्रातील सहकारी संस्थांना अर्थपुरवठा व त्यांच्याशी बँकेचे व्यवहार करणे.
२) जिल्हयातील सर्व सहकारी बँकावर नियंत्रण ठेवणे.
३) जिल्हयातील सहकारी चळवळीचा विकास साधने.
४) जिल्हयातील एकात्मिक ग्रामीण विकास योजने अंतर्गत सभासदांना कर्ज पुरवठा करणे.

**जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या समस्या :-**

**१) अल्प भांडवल पुरवठा :-**

नाबार्ड कडून राज्य सहकारी बँकांना अर्थ पुरवठा हा अल्प प्रमाणात होत असल्या कारणामुळे राज्य सहकारी बँक देखील जिल्हा बँकेला पुरेसा वित्त पुरवठा करीत नाही.

२) **वाढती थकबाकी :-**

सहकारी बँकाचे सभासद हे बहूतांश शेतकरी असल्यामुळे शेती हा व्यवसाय निसर्गावर अवलंबूनल आहे. त्यामुळे शेती उत्पादनात नुकसान झाल्यास कर्जाची थकबाकी वाढत जाते.

**३) सदोष कर्ज पध्यदती :-**

संचालक मंडळ व अधिकारी वर्ग कर्ज देतांना जवळचे नातेवाईक किंवा राजकिय व्यक्र्रींना कर्ज देतांना बँकेचे नियम न पाळता कर्ज दिल्या जाते.

**४) आजारी बँकाची वाढती संख्या :-**

सहकारी बँकेती मनामनी कारभार, भष्ट्र संचालक अधिकारी वर्ग, इत्यादी कारणामुळे तसेच इतर व्यापारी बॅकाचे वाढते प्रमाण हया मुळे अनेक सहकारी बँका बदं पडण्याच्या मार्गावर आहेत.

**५) अकार्यक्षम व्यवस्थापन :-**

बँकेच्या सभासदानी निवडून दिलेले संचालक मंडळ अधिकारी वर्ग जिल्हा बँकेचे प्रशासन सांभाळतात परंतु वैयक्तिक हित व काम चुकार पणा हया कारणामुळे व्यवस्थापन हे अकार्यक्षम बनते.

६) **कर्ज वाटपात पक्षपाती पणा :-**

संचालक मंडळ व अधिकारी वर्ग नियमाचे पालन न करता आपल्या जवळच्या व्यक्तिंना व नातावाईकांना मोठया प्रमाणात कर्ज वाटप करतात तर सर्व सामान्य सभासदांना अपुरा कर्ज पुरवठा करतात.

**७) ठेवीकडे दुर्लक्ष :-**

सहकारी बँक ही सहकारी तत्वावर चालत असल्यामुळे ठेवीवर पुरेसे व्याज देऊ शकत नाही. संचालक मंडळाचा व अधिकाऱ्याच्या भ्रष्ट कारभारामुळे जनतेचा पुर्णपणे सहकारी बँकावर विश्वास राहीलेला नाही. त्यामुळे सहकारी बँकामध्ये सर्व सामान्य जनता ठेवी ठेवत नाही.

**८) राजकारणी व्यक्तींचा प्रभाव :-**

सहकारी बँकाची निर्मीती सहकार तत्वावर झाली परंतु बँक म्हणते पैसा आणि पैसा म्हणजे स्वार्थ हया कारणामुळे सहकारी बँकावर राजकीय व्यक्तीची नेहमीच सहकारी बँकावर नजर पडली आणि त्यामुळे सहकारी बँकाची बदणामी झाली.

**प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था :-**

**उदिष्टे :-**

१) सभासदांच्या बचतीच्या प्रवृत्तीमध्ये वाढ करणे व बचतीस प्रोत्साहन देणे
२) ग्रामीण भागातील जनतेच्या सभासदांच्या ठेवी स्विकारणे
३) सभासदांना अल्प व दिर्घ मुदतीचे कर्ज वाटप करणे.
४) खते बी बियाने , किटक नाशके शेती साठी औजारे व उपयुक्त साधन सामुग्री खरेदी करून तीचे वितरणे करणे .
५) शेत मालाची विक्री सहकारी तत्वावर करण्यासाठी सभासदांना प्रोत्साहीत करणे.

**प्राथमिक कृषी पुरवत पतपुरवठा संस्थाच्या समस्या :-**

१) भांडवलाची कमतरता
२) अनियमित व अपूरा कर्ज पुरवठा
३) ठेवीचे अल्प प्रमाण.
४) वाढती थकबाकी
५) सदोष व्यवस्थापन
६) इतर व्यापारी बॅंकाशी स्पर्धा
७) काही सभासंदाकडे दुर्लक्ष

**उपाय योजना :-**

१) प्राथमिक कृषी पतपुरवठा पतसंस्था अधिक कार्यक्षम होण्यासाठी सभासदांकडून मोठया प्रमाणात ठेवी गोळा करण्यासाठी उपाययोजना करणे.
२) सदोष व्यवस्थापनातील दोष दुर करून सर्व सभासदांना नियमानुसार कर्ज पुरवठा करणे.
३) कर्मचारी अधिक कार्यक्षम बनविण्यासाठी त्यांना प्रशिक्षण देणे.
४) सर्व सभासदाचा विकास साधनण्यासाठी बँकेच्या दररोजच्या हिशोबामध्ये पारदर्शकता आणने.
५) इतर व्यापारी बँका प्रमाणे तात्काळ व्यवहार करणे.
६) आपल्या सभासदांना मार्गदर्शन करून सहकारी बँक आपल्या हिताची कशी आहे. हे त्यांना पटवून देणे.

**नागरी सहकारी बँकची कार्य व उद्दीष्टे :-**

१) लोकाकडून ठेवी स्विकारणे
२) सभासदांना अल्प व दिर्घ मुदतीचे कर्ज देणे
३) हूंडी वटविणे
४) मौल्यवान वस्तुच्या तारणावर कर्ज देणे.
५) मौल्यवान वस्तु सुरक्षित ठेवण्यासाठी लॉकरची व्यवस्था करणे.
६) बँकीगच्या इतर सुविधा पुरविणे.
७) सहकार चळवळीचा प्रसार करणे
८) एजंट म्हणून कार्य करणे.
९) बचत व काटकसरीचे महत्व समजावून सांगणे व दररोज बचत थोडी थोडी रक्कम जमा करण्यास जनतेला प्रोत्साहीत करणे.

**नागरी सहकारी बँकाच्या समस्या :-**

१) अपूरे भांडवल व्यवस्थापन
२) अकार्यक्षम व्यवस्थापन
३) शिखर बँकचा अभवा
४) कर्ज पुरवठा करतांना भेदभाव
५) वित्तीय समस्या
६) वाढती थकबाकी

**उपायोजना :-**

१) राज्य शासनाने नागरी सहकारी बँकेच्या भाग भांडवलात सहभागी व्हावे.
२) व्यवस्थापनावरील खर्च कमी करून ठेवीवर व्याज दर वाढवून देणे ज्यामुळे ठेवी ठेवण्यास जनता अकर्षीत होईल.
३) नागरी बँकच्या कारभारत पारदर्शकता आणने.
४) नागरी बँकेचे कार्यक्षेत्र साधारणपणे तालुक्या पुरते किंवा नगर पालीके पुरते असावे.
५) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेशी नागरी बँकांना संलग्नीत करण्यास यावे.

**संदर्भ :-**

१) भारतीय अर्थव्यस्था डॉ. सुधाकर शास्त्री
२) कृषी विषयक घटक - के सागर
३) ग्रामीन अर्थ व्यवस्था :- डॉ. बी. एल. माथुर
४) दे लोकमत
५) जिल्हा मध्यवर्ती बँकाचे वार्षिक अहवाल
६) योजना जानेवारी २०११
७) इंटरनेट